# संत कबीरांची कर्मकांड, अंधश्रध्दा विरोधी विचारधारा

प्रा. डॉ. सुजय बाबुराव पाटील, मराठी विभाग प्रमुख,कमला कॉलेज, कोल्हापूर. मो. ८४२१६६८४०६

.............................................................................................................................

**प्रस्तावना**

संत नामेदवांनी महाराष्ट्राबरोबरच महाराष्ट्राबाहेर देखील आपल्या अभंगातून समाज प्रबोधन केले. नामदेवांनी फक्त भातर भ्रमण केले नाही तर सद्‌विचारांची पेरणी सर्वत्र केली. त्यामुळेच उत्तरेकडे गेलेल्या नामदेवांना सिख संप्रदायाने आपल्या अंत:करणात आदराचे स्थान देऊन त्यांच्या पदांचा आपल्या 'गुरुग्रंथसाहेब' या ग्रंथात समावेश केलेला दिसतो.

याच संत नामदेवांच्या विचार प्रभावातून संत कबीर, दादू दयाल, पलटूदास इ. संत मंडळी उदयास आलेली दिसतात.

संत कबीरांनी आपल्या रचनांच्यामधून ईश्वरतत्वाची ओळख, गुरुकृपेचे महत्व, कर्मकांड, रुढीला विरोध, नामस्मरणाचे महत्व, व्यक्ति विकास इ. अनुषंगाने मांडलेल्या विचारांनी तत्कालीन १३—१४ वे शतक प्रभावित केले पण आजही त्यांचे विचार मार्गदर्शक वाटतात.

**संत कबीरांची परखड विचारधारा**

विविध नद्यांच्या मध्ये जाऊन स्नान केल्याने अथवा अंगावर विविध रुपांची वस्त्रे परिधान केल्याने परमेश्वराची प्राप्ती होत नाही.त्यासाठी प्रभूनाम रुपी नामस्मरणाचे अमृत प्राशन केले की परमात्माशी आपण एकरुप होऊ शकतो असे कबीरांचे सांगणे आहे.त्यामुळेच कबीर लिहीतात.

'संधिआ, प्रात, इस नातु कराही।
जिऊ, भए दाद्र पानी माही ।।०१।।
जउपै, राम राम रति नाही।
ते सभि, धरम राइ कै जाही ।।१।।रहाउ।
काइआ रति, बहु रुप रचाही।
तिन कउ, दइआ सुपनै भी नाही।।२।।
चारि चरन कहहि बहु आगर।
साधु सुखु पावहि, कलि सागर।।३।।
कहु कबीर, बहु काइ करी जै।
सखु छोडि, महारसु पीजै।।४।।

सोवळं ओवळं पाळणाऱ्या कर्मठांना कबीरांच सांगण आहे की अगदी सकाळ—संध्याकाळ स्नान केले म्हणजे मन स्वच्छ होते का? तसे असते तर सदैव पाण्यात राहणारी बेडकं पवित्र, स्वच्छ मनाचे म्हटली पाहिजेत, त्यामुळे सकाळ संध्याकाळ स्नान करणारा बेडका समान मानला पाहिजे.

ज्याचे मन रामनामात तल्लीन होत नाही. रामाशी एकरुप होत नाही त्यांना यमराजापुढे आपल्या कर्माचा जबाब द्यावाच लागेल. जी मंडळी केवळ शरीर भोगासाठी नानारुपे घेतात, सोंगे घेतात, त्यांच्या मनात खरा प्रेम भाव उत्पन्न झालेला नसतो.

काही विद्वान लोक केवळ चार वेद म्हणून दाखवितात. ते त्यांचे फक्त शब्द पांडित्य असते. ज्यांचे चित्त प्रभूशी एकरुप झालेले असते तेच परमात्म्याशी एकरुप होतात. त्यांना शब्द पांडित्याची गरज भासत नाही. कबीरांचे सांगणे आहे की भौतिक गोष्टींचा वृथा मोह सोडून द्यावा व परमेश्वराचे नामस्मरण रुपी अमृताचे प्राशन करावे.

केवळ जप—तप यज्ञ याग केल्याने परमेश्वर प्राप्त होत नाही त्यासाठी सर्व अहंकाराचा त्याग केल्यावरच परमेश्वराची प्राप्ती होते. कबीर लिहीतात.

किआ जपु, किआ तपु, किआ व्रत पूजा।
जा कै दिदै, माऊ है दूजा ।।१।।
रे जन, मनु माधउ सिउ लाईए।
चतुराई, न चतुरभूज पाईए ।रहाउ।।
परहरू, लोभु अरु लोकाचारु।
परहरू, कामु क्रोधु अहंकारु।।२।।
करम करत, बधे अहंमेव।
मिलि, पाथर की करही सेव।।३।।
कहु कबीर, भगति करि पाईआ।
भोले भाई, मिले रघुराईआ।।

कबीर सांगतात की, जप, तप, व्रत वैकल्ये केली तरिही मनातील द्वैत भाव नष्ट झाला नाही तर मग या सर्व गोष्टींचा लाभ काय झाला.

परमेश्वराच्या प्राप्तीसाठी फक्त नामस्मरणाचीच गरज आहे. नामस्मरणामुळेच त्या चैतन्यतत्वाची आणि आपली भेट होते. परमेश्वराच्या भेटीसाठी मानवाने लोभाचा, लोकाचाराचा, काम, क्रोध, अहंकार इ.

वासनांचा त्याग केला पाहिजे. दगडाला देव मानून त्याची पूजा अर्चा करणे. कर्मकांडामध्ये अडकून पडणे हे कबीरांना मान्य नाही. म्हणून ते सांगतात की परमात्मा केवळ नामस्मरण व भक्तीनेच प्राप्त होतो.

समाजामध्ये वर्ण श्रेष्ठत्वाच्या सनातनी कर्मठ विचारसरणीला कबीर कठोर शब्दात झिडकारताना दिसतात. ब्राह्मण कोणाला म्हणावे या प्रश्नाचे उत्तर देतांना कबीर सांगतात. जो परमात्माचा विचार करतो. परमेश्वराचे नामस्मरण करतो, तो ब्राह्मण होय. कबीर लिहितात.

गरभवास महि, कुलु नही जाती।
ब्रह्म बिंदु ते, सभ उतपाती ।।१।।
कहू रे पंडित, बामन कब के होए।
बामन कहि कहि, जनमु मत खोए।।२।।
जौ तूं ब्राह्मणु, ब्रहम्णी जाइआ।
तउ आन वाट, काहे नही आइआ ।।३।।
तुम कत ब्राह्मण, हम कत सूद।
हम कत लोहू, तुम कत दूध।।४।।
कहू कबीर, जो ब्रहम् बीचारै ।
सो ब्राह्मणु कहीअतु है, हमारै ।।५।।

जीव आईच्या गर्भात असतांना त्याला कोणतेही जात पात नसते. नसते. कारण सारे जीव परमात्म्याचे अंश असतात.

आईच्या पोटात असतांना कोणिही ब्राह्मण असत नाही. त्यामुळे मी कुळ
ब्राह्मण, ब्राह्मण असा तोरा मिरवून आपण जन्म वाया घालवू नये.

सर्वांचा जन्म आईच्याच पोटातून होत असतो. त्यामुळे कोणीही श्रेष्ठत्वाच्या गप्पा मारु नयेत.

जो परमेश्वराचे नामस्मरण करतो तोच खरा ब्राह्मण होय. कबीरांचा हा विचार जेवढा परखड आहे तेवढाच सामाजिक एकात्मतेसाठी उपयुक्त आहे. मानवी देह, संसार, माया या क्षणभुंगुर आहेत कधी नष्ट होतील सांगता येत नाही म्हणून नामस्मरणात राहून जीवनाचे कल्याण साधून घ्यावे असे कबीरांचे सांगणे आहे.

कबीर लिहितात.

अंधकार, सुखि कबहि न सोई है।
राजा, रंक, देऊ मिलि रोई है ।।१।।
जउपै रसना रामु न कहिबो।
उपजत बिनसत, रोवत रहिबो ।।२।।
जस देखीऐ तरवर की छाइआ।
प्राण गए, कहू का की माइआ ।।३।।
जस, जंती महि जीउ समाना ।
मूए, मरमु को का कर जाना ।।३।।
हंसा सखरु, कालु सरीर।
राम रसाइन पीउ रे, कबीर।।४।।

कबीरांचे सांगणे आहे की जे जीव अज्ञान अंधःकारात बुडालेले असतात त्यांना सुखाची निद्रा मिळत नाही. मग तो राजा असो की भिकारी; दोघेही खीच राहतात.

जोपर्यंत आपण नामस्मरण करीत नाही तोपर्यंत जीव हा जन्ममृत्युच्या फेऱ्यात अडकत राहणार. झाडाची सावली दिसते पण टिकून राहत नाही, सूर्य मावळला की सावली नष्ट होते तशीच अवस्था मायेची आहे. ज्याप्रमाणे तंतुवाद्याचा आवाज हा त्या वाद्यातच असतो. वाद्य वाजविणारा थांबला की आवाज नाहिसा होतो. त्याप्रमाणे मानवाच्या शरीरातून चैतन्य निघून गेले की त्याचे शरीर मृत होते. जसा हंस सदैव सरोवरामध्ये घिरटया घालत असतो. तसाच मृत्यू ही मानवावर झडप घालण्यासाठी फिरत असतो, टपून असतो. कधी तो झडप घालेल सांगता येत नाही. म्हणून प्रत्येक जीवाने प्रभू नामस्मरणाचे, रामनामाचे अमृत प्राशन करावे असे कबीर सांगतात.

कबीरांचे सांगणे आहे की बाजारातून आपण प्रत्येक वस्तू विकत घेऊ शकतो. पण परमेश्वराची कृपा ही तुमच्याजवळ कीरतीही संपत्तीच्या राशी असल्यातरी विकत घेता येत नाही. परमेश्वराच्या कृपेसाठी फक्त आणि फक्त नामस्मरणरुपी धन तुम्हाला जवळ असले की झाले परमेश्वर तुम्हाला प्राप्त झाला म्हणून समजा

कंचन सिऊ, पाईऐ नही तोलि ।
मनु दे, रामु लीआ है मोलि।।१।।
अब मोहि, रामु अपुना करि जानिआ।
सहज सुभाइ, मेरा मानु मानिआ।।
ब्रह्मै कथि कथि, अंतु न पाइआ।

राम भगति, बैठे घरि आइआ।।२।।
कह कबीर, चंचल मति तिआगी।
केवल राम भगतु निज भागी ।।३।।

कबीर सांगतात बाजारात जाऊन सोने देऊन त्या मोबदल्यात परमेश्वर विकत घेता येत नाही. आपले मन, नामस्मरण त्याला अर्पण केले की प्रभुपरमात्मा प्राप्त होतो. मी माझे मन, नामस्मरण प्रभुचरणी अर्पण केल्याने जणू मला परमेश्वर विकतच मिळालेला आहे. मला परमेश्वराने आता माझा म्हणून स्विकारलेले आहे. त्यामुळेच माझे मन सहज समाधि मध्ये मग्न झालेले आहे. 'ज्या प्रभु परमात्म्याचे गुणगान करुन प्रत्यक्ष ब्रह्माही त्याला प्राप्त करु शकला नाही तोच प्रभु परमात्मा माझ्या नामस्मरण भक्ती निष्ठेने मला प्राप्त झालेला आहे. माझी चंचलवृत्ती नष्ट होउन केवळ प्रभु नामस्मरण भक्ती माझ्या भाग्याला आलेली आहे.

जे लोक परमेश्वराचे नामस्मरण करतात ते कबीरांना आवडतात, अशा लोकांच्या चरणावरील धुळ होण्यात कबीरांना धन्यता वाटते. त्यामुळेच कबीर लिहितात.

जो जन, लेहि खसम का नाड।
तिन कै, सद बलिहारै जाड ।।१ ।।
सो निरमलु, निरमल हरि गुन गावै।
सो भाई, मेरै मनि भावै।।
जिह घट, रामु रहिआ भरपुरि।
तिन की पग पंकज हम धुरि ।।२।।
मति का धीरु द्यसहजि सहजि ,गुण रमै कबीरु ।।३।।

कबीर नामस्मरणाचे महत्व इतके मोठे मानतात की, जो माणूस प्रभु नामस्मरण करतो त्याच्यावरुन ते आपले प्राण ओवाळून टाकण्याची भाषा करतात. जे परमेश्वराचे गुणगान करतात मग ते कोणत्याही धर्मातील असोत. ते कबीरांना आपले बंधु वाटतात. कबीर सांगतात मी जातीचा विणकर आहे पण माझी मनोबुध्दी स्थिर आहे. प्रभुकृपेने मी सहजच प्रभु परमात्म्याच्या गुणात रममाण होतो.
कबीर पुढे लिहतात .

गगनि रसाल चुऐ, मेरी भाठी।
संचि महा रसु, तनु भइआ काठी ।।१।।
उआ कड, कहिऐ, सहज मतवार ।
पीवत राम रस, गिआन बीचारा ।
सहज कलालनि, जड मिलि आई।
आनंदि माते, अनदिनु जाई ।।२।।
चीनत, चीतु निरंजन लाइआ।
कहु कबीर, तौ अनभड पाइआ ।।३।।

कबीर सांगतात माझ्या दशमव्दार–रुपी भट्टीतून प्रभु नामरुपी अमृत सतत
ठिबकत आहे. हे नामामृत प्राप्त करण्यासाठी मी माझे शरीर रुपी इंधन जाळीत आहे. जी व्यक्ती राम नाम रुपी रसायन प्राशन करते ती प्रभु परत्म्याशी एकरुप होउन जाते. प्रभु नामस्मरणात दंग होणार एकत्र येतात तेव्हा ते सर्व परमात्म्याशी एकरुप झालेले असतात. कबीर सांगतात की जेव्हा मी जाणीवपूर्वक माझे चित्त त्या निरंजन प्रभु परमात्म्याशी जोडले तेव्हा मला प्रभु परमात्मा माझ्या अंतरातच आहे अशी अनुभूती प्राप्त झाली.

मनातील वाईट विचार नष्ट झाले की माणसाचे मत उन्नत अवस्थेला पोहचते. असे मन नंतर परमात्म्याच्या गुणगाना मध्ये रममाण होते. कबीर
लिहीतात.

मन का सुभाड, मनहि बिआप।
मनहि मारि, कवन सिधि थापी ।।१।।
कवतु सु मुनि, जो मनु मारे।
मन कड मारि, कहहु किसु तारै ।।२।।
मन अंतरि, बोलै समु कोई।
मन मारे बिनु भगति न होई ।।३।।
कह कबीर जो जानै भेड ।
मनु मधुसूदनु, त्रिभवण दंड ।।४।।

कबीर सांगतात माणसाचे मन मनाच्या संकल्प विकल्पाने सतत पूर्णपणे व्यापून राहिलेले असते. अशा स्थितीमध्ये मन मारण्यात काय अर्थ आहे. मन मारुन जगण्यात अर्थ नाही तर मनाला उन्नत करण्यातच महत्व आहे. माणसाच्या मनात जे विचार येतात तेच तो मुखावाटे बोलतो, म्हणून मनातील वाईट विचार नष्ट केल्या शिवाय प्रभु भक्ती करणे शक्य नाही. जो मनुष्य हे रहस्य जाणतो तोच

परमात्म्याशी मधुसुदनाशी एकरुप होतो असे त्या कबीरांचे सांगणे आहे. कबीर सांगतात आकाशातील उगवणारे तारे, चंद्र, सूर्य यांचे रहस्य फक्त प्रभु नामस्मरण करणारेच जाणतात.
कबीर लिहतात

ओइ जु दिसहि, अंबरि तारे । किनि ओइ चीते, चीतनहारे ।।१।।
कहू रे पंडित, अंबरु का सिड लागा । बूझै बूझनहारु सभागा ।।२।।
सूरज चंदु करहि उजीआरा । सभ महि पसरिआ, ब्रह्म पसारा ।।३।।
कहु कबीर, जानैगा सोइ। हिरदै रामु, मुखि रामै होइ ।।४।।

कबीरांचे सांगणे आहे की, व्यक्तीने प्रभु परमात्म्यास विसरु नये. त्याला ओळखावे व त्याच्या नामस्मरणात तल्लिन होऊन राहावे.

जोति की जाती, जाति की जोती। तितू लागे कंचूआ फल मोती
कवन् सु घरु, जो निरभड कहीए। भउ भजि जाइ, अभै होइ रहीऐ ।।१।।
तटि तीरथि, नही मनु पतीआइ। चार आचार, रहे उरझाइ ।।२।।
पाप पुंन दुइ, एक समान। निज घरि पारस, तजहू गुन आन।।३।।
कबीर, निरगुण नाम न रोसु। इसु परचाइ, परिची रहु एस ।।४।।

कबीर सांगतात ही सृष्टी परमात्म्याने निर्माण केलेली आहे. सृष्टीतील प्रत्येक जीवात परमात्म्याचा वास आहे, सृष्टीतील प्रत्येक जीवात बुध्दीरुपी प्रकाश आहे. या बुध्दीरुपी प्रकाशास दोन प्रकारची फळे लागतात. काच म्हणजे दुष्ट बुध्दी व मोती म्हणजे सुबुध्दी.

व्यक्ती भयमुक्त झाली की निर्भय होते. मनुष्याने वाईट कर्माचा त्याग न करता नदी किनारी अथवा तीर्थ स्थानी तो जाऊन राहिला तर त्याचा मनाला आनंद प्राप्त होत नाही. म्हणून मनुष्याने पहिल्यांदा आपल्यातील वाईट कर्मांचा त्याग केला पाहिजे. पाप पुण्य या मनाच्या संकल्पना आहेत. परमात्मारुपी परीस व्यक्तीच्या अंतरूकरणातच असतो. त्याचे प्रत्येकाने नामस्मरण केले पाहिजे.

'वैकुंठा' विषयी सर्व सामान्यांना विशेष आकर्षण असते. कबीर सांगतात मला वैकुंठ कुठे आहे? कसे आहे? मला माहित नाही. मी एवढेच आत्मविचारापूर्वक सांगू शकतो की वैकुंठ असेल तर ते फक्त संतांच्या सहवासात आहे. व्यक्तींनी कोणत्याही पोकळ गप्पा न मारता संतांना शरण जावे. संतांच्या नामस्मरणात सदैव तल्लीन राहावे असे कबीरांचे सांगणे आहे त्यामुळेच कबीर लिहितात.

जो जन, परमिति परमनु जाना। वातन ही, वैकुंठ समाना ।।१।।
ना जाना, वैकुंठ कहा ही। जानु जानु, सभि कहहि तहा ही।।
कहन कहावनु, नह पतीअई है। तड मनु मातै, जा ते हउमै जई है।।२।।
जब लगु, मनि वैकुंठ की आस । तब लग. होइ नही चरत निवासु ।।३।।
कहु कबीर, इह कहीऐ काहि। साध संगति वैकंठे आहि ।।४।।

कबीर सांगतात की जो मनुष्य बढाई मारुन सांगतो की प्रभु परमत्म्यास जाणले आहे. तर तो फक्त शब्दांचे द्वारेच वैकंठास पोहचतो. त्याला परमात्म्याचे खरे स्वरुप कळलेलेच नसते. मला देखील वैकुंठ कुठे आहे हे नेमके माहित नाही. वैकुंठाच्या प्राप्तीसाठी अहंभाव नष्ट होणे आवश्यक आहे. निरिच्छ होणे आवश्यक आहे. संतांच्या संगतीला लागणे, संतांचे नामस्मरण करीत राहणे आवश्यक आहे. म्हणूनच कबीर सांगतात

उपजै निपजै, निपजि समाई।
नैनह देखन, इहू जगु जाई ।।१।।
लाज न मरहू, कहहू घरू मेरा।
अंत की बार, नही कछु तेरा ।।१।।
अनिम जतन करि काइआ पाली।
मरती बार, अगनि संगि जाली।।२।।

कबीर सांगतात की प्रथम जीव जन्माला येतो तो वाढत राहतो मोठा होतो. एक दिवस मरुन जातो आपल्या डोळयादेखत संपूर्ण संसार त्यातील जीव असाच नष्ट होत जातो ही जगरहाटीच आहे. हे शरीर आपण माझे आहे असे म्हणतो, शरीराचे पालन—पोषण करतो अंगाला चंदन, अत्तर लावतो पण ते एक दिवस नष्ट झाले की हेच शरीर लाकडा बरोबर जळून जाते. या नश्वर देहाचा धनाचा आपण अभिमान का बरे बाळगावा. आपण दिवसा चरितार्थासाठी कामधंदा करतो रात्रभर झोपतो पण नामस्मरणासाठी वेळ काढत नाही. जो मनुष्य तोंडात विडा चघळत ऐट बाजी करतो. पतंगबाजी खेळत राहतो त्याला एक दिवस यमाचे दूत बांधुन घेऊन निघुन जातात. यमाच्या दूतासमोर आपली कोणतीही ऐट बाणी चालत नाही.

जो मनुष्य गुरुकडून उपदेश प्राप्त करुन घेतो सर्वांशी प्रेमाने वागतो. मनापासून प्रभुचे नामस्मरण करतो त्याला सुख प्राप्त होते. जो मनुष्य प्रभु नामाचा सुगंध आपल्या ह्रदयात धारण करतो तोच या भवसागरातुन तरुन जातो.
त्यामुळेच कबीर सांगतात—

चोआ चंदन, मरदन अंगा। सो तनु जलै, काठ कै संगा।।१ ।।
इसु तन धन की, कवन बडाई। धरनि परै उखारि, न जाई ।।१ ।।
राति जि सोचहि, दिन करहि काम । इकु खिनु लेहि न हरि का नाम।।२ ।।
हाथि त डोर, मुखि खाईओ तंबोर। मरती बार, कसि बाधिओ चोर।।३ ।।
गुरमति रसि रसि, हरि गुन गावै । रामें राम रमत, सुखु पावै ।।४।।
किरपा करि कै, नामु द्रिडाई। हरि हरि बासु, सुगंध बसाई ।।५।।
कहत कबीर, चेति रे अंधा द्य सति राम, झुठा सभु धंधा।।६ ।।

कबीर सांगतात की नामस्मरण करीत आपण आपले चिता परत्म्याकडे वळवले, आध्यात्म्याकडे वळवले की आपले दु:ख दूर होऊन आपण सुखी होतो. आपले कालचे वैरी आजचे मित्र होतात. माझ्या नामस्मरणाचा प्रभावामुळे ते वैरत्व विसरुन प्रभुचे सज्जन भक्त बनले आहेत. नामस्मरणाच्या प्रभावामुळे सर्वत्र आनंदी आनंदच दिसत आहे. माझे मन शांत झोपले आहे. माझा स्वरुपाची जाणीव मला झालेली आहे. मूळ परमात्म्याशी मी तल्लीने झाल्या मुळे माझे मन या मोह मायारुपी संसारात राहन ही मोहमायेच्या पलीकडे पोहचलेले आहे. आता मला कोणती भीती नाही व मी देखील कोणाला भीती दाखवत नाही. हा सर्व नामस्मरणाचा महिमा आहे. त्यामुळेच कबीर लिहीतात—

जम ते उलटि, भए है राम।
दुख बिनसे, सुख कीओ बिसराम।
बैरी उलटि अए है मीना।
साकत उलटि, सुजन भए चीना।।१ ।।
अब मोहि सरब कुसल करि मानिआ।
शांति भई,जब गोबिदु जानिआ।।२ ।।
तन महि, होती कोटि उपाश्चि।
आपु पछानै, आपै आप।
रोगु न बिआपै, तीनौ तापं।
अब मनु उलटि, सनातनु हुआ।
तब जानिआ जब जीवत मुआ।
कहु कबीर, सुखि सहनि समावउ।
आपि न डरउ, न अवर डरावउ ।।३ ।।

**समारोप**

संत कबीरांच्या रचनांच्यामधून परखडपणाचे दर्शन घडते, नामस्मरणाचे महत्व, तीर्थक्षेत्रा विषयींचा विवेकी विचार, गंगास्नानातील फोलपणा, शब्दपांडित्यांची निष्क्रियता इ. बाबतीतील कबीरांचे विचार त्यांच्या बुध्दिप्रामाण्यवादी भूमिकेवर प्रकाश टाकताना दिसतात. त्यांच्या विचार प्रबोधनाने तत्कालीन समाज जीवनाचे झालेले भरणपोषण आधुनिक, सुधारणावादी विचारसरणीची पायाभरणी ठरली असे आपणाला म्हणता येते.

**निष्कर्ष**

१) संत कबीरांनी शब्द पांडित्याला विरोध करुन स्वानुभूतीला महत्व दिलेले आहे.
२) अंधश्रध्देला, कर्मकांडांना विरोध करताना संत कबीरांनी बुध्दि प्रामण्यवादी भूमिकेचा स्वीकार केलेला दिसतो.
३) समाजामधील वर्णश्रेष्ठत्वाच्या सनातनी कर्मठ विचारसरणीला कबीरांनी कठोर शब्दात झिडकारलेले दिसते.
४) दैनंदिन लोकाचारामधील, निसर्गामधील गोष्टींचे दाखले कबीरांनी दिल्यामुळे त्यांच्या विचाराला सामाजिक स्वीकाराच्याबाबतीत कुठेही अडथळा येताना दिसत नाही.
५) संत—सज्जनांच्या सेवेचे महत्व विशद करताना कबीर संतत्वाची व्यापक व्याख्या विशद करतात.
६) संत कबीरांची वाणी मराठी संतांची वाणी विशेष करुन 'संत तुकाराम' यांच्या वाणीतील परखडपणाचे साम्य दिसून येते.

**संदर्भ**

१) म्हणे कबीर— अनुवादक—विनायक लिमये, तारासिंह गोरोवाडा, प्रकाशक— सिख धर्म प्रचार कमिटी पुणे, प्रथमावृत्ती, मार्च २००६,
२) कबीर ग्रंथावली.